# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## प्रादेशिक बातमीपत्र
## सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:04.05.2025** **वार : रविवार**

ठळक बातम्या

1. पुणे रेल्वे स्थानकाचा कायापालट; चार नव्या फलाटांसह जागतिक दर्जाची सुविधा

2. सांगली जिल्ह्यातील येरळा वाणीला राष्ट्रीय पुरस्कार

3. वेव्हज परिषदेत सात जागतिक कंपन्यांचा इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीसोबत सामंजस्य करार

4. गोव्यात शिरगाव इथं लईराई देवीच्या जत्रेत चेंगराचेंगरी होऊन सहा जणांचा मृत्यू आणि

5. नऊ तारखेपर्यंत राज्याच्या विविध भागांत जोराचे वारे आणि विजांसह पाउस पडण्याचा इशारा

यासह #आकाशवाणीपुणे केंद्रावरील #प्रादेशिकबातम्या खालील लिंकवर...

https://youtube.com/live/ijvzH1rNaVg?feature=share

**रेल्वे-पीआयबी**

पुण्यातील रेल्वे स्थानकाचा सर्वांगीण कायापालट करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. या अंतर्गत चार नवीन फलाटांची उभारणी आणि जागतिक दर्जाची डिजिटल यंत्रणा स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल दिली. हडपसर इथून सुरू होणाऱ्या हडपसर–जोधपूर एक्सप्रेस आणि एमजीआर चेन्नई सेंट्रल–भगत की कोठी एक्सप्रेस

गाड्यांचा आरंभ करताना वैष्णव बोलत होते. यावेळी सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च आणि तंत्रशिक्षण आणि संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील, खासदार श्रीरंग बारणे आणि मेधा कुलकर्णी उपस्थित होते. तसंच  माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल. मुरुगन आणि गजेंद्रसिंह शेखावत दूरस्थ पद्धतीनं सहभागी झाले होते. वैष्णव यांनी सांगितलं की, पुणे, हडपसर, खडकी, शिवाजीनगर, उरळी कांचन आणि आळंदी या सहा स्थानकांचा विकास आराखडा अंतिम टप्प्यात आहे. पुणे–नाशिक मार्गावर देखील नवीन ट्रॅकच्या चाचण्या सुरू आहेत. पुणे–लोणावळा मार्गावर तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकचं काम लवकरच पूर्ण होईल अशी माहिती त्यांनी दिली.

**वेव्ज -कम्युनिटी रेडिओ**

कम्युनिटी रेडिओच्या देशभरात सुरु असलेल्या कार्याची, माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉक्टर एल मुरुगन यांनी प्रशंसा केली आहे. ते काल मुंबईत वेव्हज् परिषदेत कम्युनिटी रेडिओच्या उदघाटन सत्राला संबोधित करताना बोलत होते. सर्व कम्युनिटी रेडिओ काही उद्दिष्टांसाठी चालवले जात असून त्यामुळं आपल्या परंपरांना प्रोत्साहन मिळत आहे असं ते म्हणाले. दहाव्या राष्ट्रीय कम्युनिटी रेडिओ पुरस्कारांचं वितरण मुरुगन यांच्या हस्ते यावेळी झालं. नवोन्मेष श्रेणीत सांगली जिल्ह्यातल्या येरळा वाणी या कम्युनिटी रेडिओला राष्ट्रीय पातळीवर पहिला पुरस्कार प्रदान करण्यात आला. जत तालुक्यातील जालिहाळ बुद्रुक आणि परिसर या येरळाच्या प्रकल्प विभागात हा रेडिओ ऐकू येतो. या भागात होणारी लहान वयातील लग्नं, मुलगाच हवा यासाठी केली जाणारी एकापेक्षा जास्त लग्नं या विषयावरील कथा नाट्य रूपांतरित करून स्पर्धेसाठी येरळा वाणीनं पाठवली होती. राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल आकाशवाणीशी बोलताना येरळा वाणीच्या केंद्र अधिकारी नीता जोशी म्हणाल्या.....

एका कुटुंबांमधे वारंवार मुलीच होत होत्या , म्हणून त्या स्त्रीचा छळ होत होता. तिचा  नवरा दूसर लग्न करणार होता, पण दरम्यान त्यांनी आमच्या रेडिओ वरचा कार्यकम ऐकला , या कार्यक्रमात मुली होण्यासाठी स्त्री जबाबदार नसून पुरुष जबाबदार आहे अस सांगताना डॉक्टरांनी X आणि Y ची गुणसूत्रे समजाविन दिली हि माहिती ऐकल्यानंतर , तिच्या नवऱ्याने दुसरे लग्न करण्याचा निर्णय बदलला आणि या मुली माझ्या मुलच आहेत अस आई वडलांना समजावून सांगितले  आणि या मुळे त्या कुटुंबात जो बदल झाला या सगळ्या विषयी आम्ही एक कार्यक्रम तयार केला ज्यात सुजाताची

मुलाखत घेतली. आणि हा AUDIO कार्यक्रम आम्ही स्पर्धेसाठी पाठवला. तर कम्युनिटी रेडीओ च्या या स्पर्धेत मोस्ट इनोव्हेटिव्ह प्रोग्रॅम प्रकारात हा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

**वेव्ज-करार**

WAVES शिखर परिषद एक नव्या युगाची नांदी असल्याचं केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी मुंबईत आयोजित वेव्हज परिषदेत काल सांगितलं. अनेक जागतिक कंपन्यांनी या संदर्भात भारतासोबत काम करण्याची तयारी दर्शविली असून गुगल, मेटा आणि मायक्रोसॉफ्टसह सात जागतिक कंपन्यांनी वेव्हज परिषदेदरम्यान इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीसोबत सामंजस्य करार केला. आज या परिषदेची सांगता होत आहे.

**कर-सल्लागार**

पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचं स्वप्न साकार करण्यासाठी कर सल्लागार, सनदी लेखापाल यांच्यासह करदात्यांची भूमिका मोलाची आहे. योग्य करसंकलन आणि व्यवस्थापन, पारदर्शी अर्थव्यवस्था यासाठी आर्थिक क्षेत्रातील व्यवसायिकांनी अर्थकायद्यातील नवे बदल, कृत्रिम बुद्धिमत्ता, चॅट जीपीटीसारखं प्रगत तंत्रज्ञान आत्मसात करायला हवं असं केंद्रीय कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाच्या अपील प्राधिकरणाचे सदस्य  बी. एम. शर्मा यांनी सांगितलं. महाराष्ट्र कर सल्लागार संघटनेच्यावतीने आयोजित 'अमृत ज्ञानकुंभ 2025', या दोन दिवसांच्या राष्ट्रीय कर परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते काल पुण्यात बोलत होते. कर सल्लागार : पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे आधारस्तंभ' अशी या कर परिषदेची संकल्पना आहे. या परिषदेत  प्रथमच 'टॅक्स का ओपीडी'मध्ये प्राप्तिकर, जीएसटी, रेरा, माहिती अधिकार, एलबीटी, सायबर कायदा यावर तज्ज्ञांचं मार्गदर्शन  होणार आहे.

**पर्यटन**

महाबळेश्वर इथं आयोजित महाराष्ट्र महापर्यटन उत्सवात काल विल्सन पॉईंट इथं योग सत्र आणि मॉर्निंग रागाज – वाद्य संगीत, फन रन आणि सायक्लथॉन यांचं आयोजन करण्यात आलं. आजअखेर

चालणाऱ्या या उत्सवात विविध नामवंत कलाकारांचे सांस्कृतिक कार्यक्रम, किल्ले आणि शस्त्रं प्रदर्शन, खाद्य उत्सव, साहसी खेळ, मुलांसाठी कार्यशाळा, हेलिकॉप्टर राईड, ड्रोन शो, फ्ली बाजार, मंदिर तथा अन्य पर्यटन स्थळांना भेटी, छायाचित्रकला कार्यशाळा, तरंगता बाजार, जल पर्यटनातील संधी, बायोडायनामिक फार्मिंग शाळा, अशा अनेक भरगच्च कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**जळगाव**

जळगावमधील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात विविध उपचारांसाठी जिल्हा वार्षिक नियोजनाच्या निधीतून अत्याधुनिक यंत्रसामग्री घेतली असून, अद्ययावत थ्री टी एमआरआय यंत्राचं लोकार्पण झाल्यामुळं एवढ्या सुविधा असलेलं हे राज्यातील पहिले केंद्र ठरलं, असल्याचं पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी काल सांगितलं. या वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात मानवी अवयव प्रत्यारोपण वगळता सर्व शस्त्रक्रिया होतील, असं सांगून राज्यातील पहिलं वैद्यकीय हब जळगावमध्ये साकारलं जात असल्याचा उल्लेख जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी केला.

**सातारा-सैनिकस्कूल**

राज्यातील सैनिकी शाळांमधील अधिकाधिक तरुण एनडीएमध्ये जाण्यासाठी सैनिकी शाळांनी चौकटीच्या बाहेर जाऊन प्रयत्न करावेत, या शाळांना येणाऱ्या आर्थिक समस्या सोडविण्यासाठी शासनस्तरावर निश्चीत प्रयत्न केले जातील, असं आश्वासन शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी काल सातारा इथं दिलं. सातारा इथल्या सैनिकी शाळेत आयोजित राज्यातील 38 सैनिकी शाळांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. राज्यामध्ये सातारा आणि चंद्रपूर इथं शासकीय सैनिकी शाळा तर अन्य 38 सैनिकी शाळांमध्ये 12 हजार 224 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सातारा इथल्या सैनिक शाळेची कारकीर्द अभिमान वाटावा अशी कायम राहीली आहे, असं भुसे यांनी सांगितलं.

**पुतळा**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवणजवळ राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य पुतळ्याचं दर्शन 11 मे या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घेणार आहेत. 31 कोटी 75 लाख खर्चून शिवरायांचा हा पुतळा राम सुतार आर्ट्स क्रिएशन्स या कंपनीन उभारला आहे. या तलवारधारी कास्य पुतळ्याची उंची 60 फूट आहे. या पुतळ्याच संकल्पन मुंबईच्या आयआयटीकडून तपासून घेण्यात आलं आहे.

**गोवा**

गोव्यातल्या शिरगाव इथल्या लईराई देवीच्या जत्रेत काल पहाटे झालेल्या चेंगराचेंगरीत सहा जणांचा मृत्यू झाला असून 80 जण जखमी झाले आहेत. देवळाच्या आवारात निखाऱ्यांवरून अनवाणी चालण्याच्या पारंपरिक कार्यक्रमासाठी प्रचंड गर्दी झाली होती. यावेळी उपस्थित असलेल्या हजारो भाविकांमध्ये अचानक गोंधळ माजून ढकलाढकली झाली आणि अनेक भाविक एकमेकांच्या अंगावर पडून जखमी झाले.

**रोजगार**

नांदेड जिल्हा पोलीस दलाच्या वतीनं घेण्यात आलेल्या पहिल्याच रोजगार मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या मेळाव्यात दुपारपर्यंत 3 हजार विद्यार्थ्यांना नियुक्ती पत्र देण्यात आल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिली. देशभरातील 96 कंपनीच्या प्रतिनिधींनी उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना या मेळाव्यातच नियुक्तीपत्रं देण्यात आली.

**आयपीएल**

आय पी एल क्रिकेट स्पर्धेत काल अत्यंत चुरशीच्या सामन्यात  रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु संघानं काल चेन्नई सुपर किंग्ज संघाचा 2 धावांनी पराभव केला.  बंगळुरूने जेकब बेथल, विराट कोहली आणि रोमारिओ शेफर्ड यांच्या अर्धशतकांच्या जोरावर  213 धावा केल्या. शेफर्डने 6 षटकार आणि 4

चौकार ठोकत 14 चेंडूत 53 धावा केल्या.चेन्नईकडून आयुष म्हात्रेने 94 तर रवींद्र जडेजानं 77 धावा केल्या.

**पाऊस-गोंदिया**

गोंदिया जिल्ह्यात काल दुपारी अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळं आमगाव तालुक्यातील कट्टीपार इथं एका घरावरील लोखंडी पत्रे उडून पडले,  घराजवळील एक विद्युत खांब पडून गोठ्यातील एक बैल मरण पावला. गडचिरोलीतही वादळ आणि विजांसह पाऊस पडला.

**हवामान**

मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि विजांसह पाउस पडण्याचा अंदाज आहे. नऊ तारखेपर्यंत राज्यात विविध ठिकाणी असं हवामान राहण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**